## <u>नियमित दिवाणी मुकदमा नं.२१५/२००४ मधील नि.क्र.१९० वरील आदेश :</u>

१. अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र आणि नि. क्रं. १९४ ला प्रतिवादी नं. ३ ने प्रस्तुत अर्जावर दिलेले म्हणणे यांचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. तेंव्हा एकच वादप्रश्न निश्चितीकरणासाठी उपस्थित होतो तो असा की, ''मागणीप्रमाणे अर्ज मंजूर करता येईल का ?'' या वरील माझा निष्कर्ष मी खालील नमूद कारणांमुळे ''**होकारार्थी**'' नोंदविला आहे.

## <u>कारणमिमांसा</u>

२. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१० ते १७ यांनी केलेली अभिकथने सारांशाने अशी की, प्रतिवादी क्र.३ चा जबाब नि.क्र.४३ प्रमाणे दिनांक ०९/०२/२०११ रोजी न्यायालयात दाखल झाला आणि दिनांक २०/०१/२०१२ रोजी सदर साक्षीदाराचा उलटतपास झाला. त्यानंतर हे प्रतिवादी त्रयस्थ इसम म्हणून हजर झाले. त्यांना दाव्यात समाविष्ट करण्यात आले आणि त्यांनी प्रतिदावा दाखल केला. त्यानंतर या प्रतिवादीमार्फत दिनांक २७/०६/२०१६ रोजी उलटतपास केला गेला. त्यानंतर प्रतिवादी क्र.३ तर्फे दिनांक २६/१०/२०१६ रोजी बेचनपत्र, विशेष दिवाणी दावा क्र.३८/१९३६ मधील हुकूमनामा, उपविभागीय अधिकारी पारनेर यांचेकडील दिनांक ०१/१२/१९८२ चे पत्र, फेरफार आणि विशेष दिवाणी दावा क्र.६९/१९५१ मधील काही कागदपत्रे दाखल केली आहेत. सदर कागदपत्रे प्रतिवादी क्र.३ ने जाणीवपूर्वक या प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी मिळू नये म्हणून त्यांच्या वतीने उलटतपास पूर्ण झाल्यानंतर दाखल केलेली आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.३ चा उलटतपास या प्रतिवादींनी घेणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादी क्र.३ च्या अभिकथनांचा सारांश असा की, सदर अर्ज दाखल करण्याचा प्रतिवादी क्र.१० ते १७ यांचा हेतू प्रामाणिक नाही, केवळ चौकशीचे कामकाज लांबविण्याच्या दृष्टीने तो दिलेला आहे. शिवाय प्रस्तुत अर्ज देण्यापूर्वीच प्रतिवादी क्र.१० गंगूबाई परदेशी मयत झालेली आहे. परंतु, ही बाब लपवून ठेवून प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. हा अर्ज

देतांना प्रतिवादी क्र.१० ते १७ या सर्व संबंधित प्रतिवादींच्या सहया/अंगठे अर्जावर असणे गरजेचे होते.

४. प्रतिवादी क्र.३ चा उलटतपास वादींनी त्याचवेळी घेतलेला आहे. त्यानंतर सदर प्रतिवादी क्र.१० ते १७ यांचेकरिता दिनांक २७/०६/२०१६ रोजी उलटतपास घेण्यात आलेला आहे. निशाणी क्र.४३ च्या सरतपासामध्ये प्रतिवादींनी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचा उल्लेख आहे. त्यामुळे, सदरील कागदपत्रे प्रतिवादींनी स्वत: उपलब्ध करुन घ्यायला हवी होती आणि त्यावर उलटतपास घेणे आवश्यक होते. केवळ कागदपत्रे उशिरा दाखल केल्यामुळे या प्रतिवादींना उलटतपासाचा अधिकार प्राप्त होत नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेतील तरतुदीप्रमाणे आता कोणताही साक्षीदार अतिरिक्त उलटतपासासाठी बोलविता येणार नाही, वगैरे.

५. उभय पक्षांच्या वतीने केले गेलेले युक्तीवाद त्यांच्या अभिकथनांनुरुप आहेत.

६. नि.क्र.४३ च्या सरतपासाचे अवलोकन केले असता बेचनपत्र आणि विशेष दिवाणी दावा क्र.३६/१९३६ मधील हुकूमनामा आणि प्रस्तुत अर्जातील नमूद कागदपत्रांचा उल्लेख त्यामध्ये आहे. परंतु, ही देखील वस्तुस्थिती आहे की, सदरील कागदपत्रे त्यावेळी या प्रतिवादींनी दाखल केलेली नव्हती. ती कागदपत्रे प्रतिवादी क्र.३ ने दिनांक २६/१०/२०१६ रोजी दाखल केलेली आहेत. जेंव्हा की, सदर साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.१० ते १७ च्या वतीने दिनांक १९/०८/२०१६ रोजीच पूर्ण झालेला होता. अशा परिस्थीत प्रतिवादी क्र.१० ते १७ यांना मागाहून दाखल झालेल्या कागदपत्रासंदर्भात उलटतपास घेण्यास परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

७. या संदर्भात प्रतिवादी क्र.३ च्या वतीने - **Ram Rati V/s. Mange Ram (D) through Lrs. & Ors., reported in 2016 SAR (Civil) 511.**

या न्यायनिवाडयातील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निरिक्षणांचा आधार घेण्यात आला. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रमिका १८ नियम १७ अन्वये पुरावा बंद झालेला असतांना राहून गेलेल्या मुददयासंदर्भात साक्षीदाराला पुन्हा बोलविता येणार

नाही असे निरिक्षण नोंदविलेले आहे. या न्यायनिवाडयातील वस्तुस्थिती माझे समोरील प्रकरणापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. कारण साक्षीदाराला पुंन्हा बोलाविण्याची मागणी केवळ उलट तपासासंदर्भात आणि मागाहून दाखल केलेल्या कागदपत्रासंदर्भाने आहे. राहून गेलेला पुरावा दाखल करण्यासाठी नाही.

८. अर्जदारांच्या वतीने त्यांच्या विधिज्ञांनी **पॅन्थम ब्राम्हम //वि// गोल्लीपल्ली स्वामीनायडू, १९९६ सुप्रीम (एपी) ४२०** इथे नमूद निवाडयातील मा. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयांच्या निरीक्षणांचा संदर्भ दिला. त्यामध्ये दिवाणी प्रक्रियेच्या संहितेच्या क्रमिका १८ नियम १७ अन्वये न्यायालय स्वत:हून किंवा कोणत्याही पक्षकाराच्या विनंतीवरुन साक्षीदाराला परत बोलविण्याचा अधिकार वापरु शकते असे निरीक्षण नोंदविलेले आहे.

९. प्रतिपक्षाने उलटतपासानंतर दाव्याशी निगडीत कागदपत्रे दाखल केलेली असल्यामुळे त्या कागदपत्रा संदर्भाने उलटतपास घेण्याचा कायदेशीर अधिकार प्रतिवादी नं. १० ते १७ यांना आहे. दाव्याच्या योग्य न्यायनिर्णयासाठी ते आवश्यक आहे. या सर्व कारणांमुळे पुढील आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

३. प्रकरण खूप जुने असल्यामुळे सर्व पक्षांनी ते लवकरात लवकर निकाली होण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे.

४. पुढील तारखेस प्रतिवादी क्र.३ आणि प्रतिवादी क्र.१० ते १७ यांनी उलटतपास होण्याच्या दृष्टीने न चुकता उपस्थित रहावे.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर).

(वर्षा बा. पारगांवकर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीगोंदा

दिनांक : २१/०२/२०१७.